GOVERNMENT OF MAHARASHTRA
MAHARASHTRA STATE COMMON ENTRANCE TEST (CET) CELL
8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001
Tele. No. - 022-22016157/53/59 Website -www.mahacet.org E-Mail-cetcell@mahacet.org

No.MED-1026/CR.No.83/UG-2026/CAP-2/Pvt College/Preference/2227 Date : 10/09/2026

NOTICE NO. 15
NEET-UG 2026

Regarding Admission to MBBS/BDS (Group-A) Courses in
Private University Colleges through CAP Round-2 for Academic Year 2026-27

References: 1. Higher and Technical Education Department, Gazette Notification No. 506 & 507, dated 07/09/2026.
2. Medical Education and Drugs Department, letter dated 09/09/2026.
3. Higher and Technical Education Department, letter dated 10/09/2026.

As per the Maharashtra Private Universities (Establishment and Regulation) Act, 2023, the Gazette Notification referred to at Sr. No. 1 above states that Dr. Balasaheb Vikhe Patil University, Ahilyanagar and Lata Mangeshkar University, Nagpur have commenced functioning as Private Universities. The following institutions are included under the said Private Universities:

1. Dr. Vithalrao Vikhe Patil Foundation's Medical College, Ahilyanagar
2. N.K.P. Salve Institute of Medical Sciences, Nagpur
3. Ranjit Deshmukh Dental College and Research Centre, Nagpur

The Medical Education and Drugs Department and the Higher and Technical Education Department, vide the letters referred to above, have informed regarding the inclusion of the above colleges in CAP Round-2 for admission to MBBS and BDS (Group-A) courses for Academic Year 2026-27.

The process of filling in preferences by candidates for the second round of admission to MBBS and BDS (Group-A) courses is currently underway. As informed by the Government, the above colleges will be included in CAP Round-2, and admissions will be carried out on the basis of preferences filled by candidates.

The details regarding the seats available for admission in these colleges, their category-wise distribution is made available on the website. Candidates should visit the respective college website for details about fees structure.

40% of the total intake capacity of these colleges shall be reserved for candidates having Maharashtra State Domicile (i.e. Maharashtra State Candidature), while the remaining 60% seats shall be filled from amongst the candidate on All India basis. However, out of the 60% seats, a maximum of 15% seats shall be reserved for Non-Resident Indian (NRI) candidates. If eligible candidates belonging to the NRI category are not available for the seats reserved under the 15% NRI quota, such seats shall be filled from amongst the candidate on All India basis from CAP Round-3 onwards.

Accordingly, candidates shall complete the preference-filling process by taking the following points into consideration:

- Candidates having Maharashtra State Domicile (i.e. Maharashtra State Candidature), can fill preferences for the State Quota (40%), All India Quota (45%) (AIQ) and NRI Quota seats in the said colleges. However, NRI quota seats will be available to such candidates from CAP Round-3 onwards.
- Candidates from outside Maharashtra (OMS) can fill preferences only for All India Quota (45%) (AIQ) and NRI Quota seats. However, NRI quota seats will be available to such candidates from CAP Round-3 onwards.
- NRI candidates can fill preferences only for the 15% NRI Quota seats. Such candidates shall not be eligible for any other quota.

**In view of the above, the preference-filling process is hereby extended up to Morning 10:00 am on 12/09/2026 to enable candidates to fill their preferences.**

Candidates who have already registered/submitted their preferences and wish to make any changes/corrections in their preferences may unlock their preferences through their login and make the necessary changes within the prescribed time limit.

Candidates are advised to regularly visit the official website of the State Common Entrance Test Cell for notifications, updated information and further instructions regarding the admission process.

Sd/-
Commissioner,
Maharashtra State Common Entrance
(Test) Cell, Mumbai

महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.वैशिप्र-१०२६/प्र.क्र.८३/युजी २०२६/प्रवेश फेरी २/खाजगी विद्यापीठ/प्रवेश/२२२७ दिनांक : १०/०९/२०२६

## सुचना क्रमांक - १५
## नीट युजी २०२६

### शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एमबीबीएस/बीडीएस (गट-अ) अभ्यासक्रम केद्रिभुत प्रवेश फेरी २ खाजगी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांतील प्रवेशाबाबत

संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेकडील राजपत्र क्रमांक ५०६ व ५०७, दिनांक ०७/०९/२०२६
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, यांचेकडील पत्र दिनांक ०९/०९/२०२६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचेकडील पत्र दिनांक १०/०९/२०२६

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ अन्वये संदर्भ क्रमांक १ येथील शासन राजपत्रामध्ये डॉ.बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ, अहिल्यानगर व लता मंगेशकर युनिव्हर्सिटी, नागपूर यांना खाजगी विद्यापीठ म्हणून कार्यान्वित झाल्याचे नमूद आहे. सदर खाजगी विद्यापीठांतर्गत खालील संस्थांचा समावेश आहे.

१. डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे मेडीकल कॉलेज, अहिल्यानगर
२. एन.के.पी. साळवे, इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, नागपूर
३. रणजित देशमुख दंत महाविद्यालय व रिसर्च सेंटर, नागपूर

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच उच्च् व तंत्र शिक्षण विभाग यांनी वरील महाविद्यालयांचा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एमबीबीएस व बीडीएस (गट अ) अभ्यासक्रमाच्या प्रवेश फेरी २ मध्ये समावेश करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

एमबीबीएस व बीडीएस (गट अ) अभ्यासक्रम प्रवेशाच्या दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी उमेदवारांकडून पसंतीक्रम भरुन घेण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. शासनाने कळविल्यानुसार सदरील महाविद्यालयांचा प्रवेश फेरी २ मध्ये समावेश करुन उमेदवारांकडून पसंतीक्रम घेवून विद्यार्थी प्रवेश करण्यात येणार आहेत. सदर महाविद्यालयांतील प्रवेशासाठी उपलब्ध जागा व त्यांचे वर्गीकरण संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर महाविद्यालयांचे शुल्काबाबत उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयाचे संकेतस्थळावरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

सदरील महाविद्यालयांमध्ये एकूण प्रवेश क्षमतेच्या ४० टक्के जागा ह्या महाराष्ट्र राज्यातील अधिवास म्हणजेच (**महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारांसाठी**) राखीव राहतील. उर्वरीत ६० टक्के जागा ह्या अखिल भारतीय स्तरावरावरील उमेदवारांमधून भरण्यात येतील. तथापि ६० टक्के जागांमधून जास्तीत जास्त १५ टक्के जागा ह्या अनिवासी भारतीयांसाठी राखीव राहतील. १५ टक्के अनिवासी भारतीय कोट्यातून राखीव जागांवर प्रवेशासाठी संबधित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास तिसऱ्या प्रवेश फेरीपासून सदर जागा ह्या अखिल भारतीय स्तरावरावरील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

त्यानुसार सर्व उमेदवारांनी पसंतीक्रम भरताना खालील मुद्यांचा विचार करुन पंसतीक्रम प्रक्रिया पुर्ण करावी.

- महाराष्ट्र राज्याचे अधिवास म्हणजेच (**महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या**) उमेदवारांना सदरील महाविद्यालयातील राज्य कोटा (४० टक्के) व ऑल इंडिया कोटा (४५ टक्के) (AIQ) व अनिवासी भारतीय कोटा (NRI) करीता पसंतीक्रम भरता येतील. तथापि एनआरआय कोट्याच्या जागा ह्या त्यांना तिसऱ्या फेरीपासून उपलब्ध होतील.

- महाराष्ट्र राज्याबाहेरील (OMS) उमेदवारांना केवळ ऑल इंडिया कोटा (४५ टक्के) (AIQ) व अनिवासी भारतीय कोटा (NRI) करीता पसंतीक्रम भरता येतील. तथापि एनआरआय कोट्याच्या जागा ह्या त्यांना तिसऱ्या फेरीपासून उपलब्ध होतील.
- अनिवासी भारतीय उमेदवारांना (NRI) केवळ १५ टक्के अनिवासी भारतीय कोट्यासाठी पसंतीक्रम भरता येतील. सदर उमेदवार इतर कोणत्याही कोट्यासाठी पात्र ठरणार नाहीत.

त्यानुषंगाने उमेदवारांना पसंतीक्रम भरता यावा याकरीता **पंसतीक्रम प्रक्रियेस दिनांक १२/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत मुतदवाढ देण्यात येत आहे.** ज्या उमेदवारांनी यापूर्वीच पसंतीक्रम नोंदविले/भरले आहेत आणि त्यांना त्यांच्या पसंतीक्रमामध्ये बदल/दुरुस्ती करावयाची असल्यास, विहित कालावधीत उमेदवाराला त्याच्या लॉगिनमधून पसंतीक्रम अनलॉक करून त्यामध्ये आवश्यक ते बदल करता येतील. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेबाबतच्या अधिसूचना, अद्ययावत माहिती व पुढील सूचनांसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळास नियमितपणे भेट द्यावी.

या सूचनेच्या मराठी व इंग्रजी आवृत्तींमध्ये कोणतीही तफावत अथवा विसंगती आढळल्यास, इंग्रजी आवृत्ती अंतिम व बंधनकारक राहील.

स्वाक्षरी/-

आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई